# बा. सी. मर्ढेकर यांच्या कवितेतील आध्यात्मिकता

**डॉ अमृता इंदूरकर**

आय ४३ तात्या टोपे नगर, नागपूर ४४००१५

महाराष्ट्र भारत

अर्वाचीन मराठी काव्यात बाळ सीताराम मर्ढेकर ह्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. किंबहुना अर्वाचीन मराठी काव्याचा आढावा घेताना मर्ढेकरांच्या कवितेला टाळून पुढे जाता येणेच अशक्य. वास्तव परिस्थितीशी झगडून सामान्य माणसाचा व्यक्त होणारा आर्तमय हुंकार म्हणजे मर्ढेकरांची कविता एकीकडे परंपरेची, सश्रद्ध संस्कारांची पाळमुळं घट्टपणे अंतर्मनात रूतून असणारी तर दुसरीकडे नवीनतेची कास भीत–भीत स्वीकारणारी नवे आस्तिकयविचार मांडणारी कविता म्हणजे मर्ढेकरांची आध्यात्मिक कविता. प्राचीन अध्यात्मविचार आणि वर्तमानात जगत असताना वांरवार समोर येणारे नवविचार यांच्या संघटनातून मर्ढेकरांची आध्यात्मिक कविता आकारास आलेली आहे. या कवितेची बरीचशी पृथगात्मता या वस्तुस्थितीशी संबंधित आहे.

मर्ढेकरांच्या आध्यात्मिक कवितेतील या पृथगात्मतेचे आणि उत्कटतेचे स्वरूप लक्षात घेताना त्यांच्या व्यक्तिमत्त्वापासून सुरूवात करावी लागते. एक कवी म्हणून असणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांचे लौकिक व्यक्तिमत्त्व हे एका दृष्टीने बरेचसे समांतर जाणारे आहे. त्यांच्या जीवनाचे प्रतिबिंबच त्यांच्या काव्यात उतरलेले दिसते. रामदासी संप्रदाय लाभलेले मर्ढेकर मुळातच ईश्वरशरण, सुसंस्कृत, सनातनी, धर्मनिष्ठ वातावरणात वाढले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सगुणोपासना होती तरी ईश्वरी आस्तित्व आणि मानवाचा या विश्वाशी असणारा संबंध यांचा शोध त्यांनी कायमच डोळसपणे घेतला. मनाला पडलेला प्रत्येक प्रश्न तर्कबुद्धीवर तपासून बघण्याचा त्यांचा स्वभावच होता. त्याचबरोबर बायबल व हिंदू ग्रंथांच्या पठणाने मर्ढेकरांच्या विचाराला एक धार लाभली होती. संतवाङ्मयाचाही त्यांच्या आध्यात्मिक कवितेवर गहिरा प्रभाव पडला होता. त्यांच्यावर झालेले जुने संस्कार संतांची महती गाताना दिसतात.

"कुठे ज्ञानेश्वर श्रेष्ठ । कुठे तुकाराम पवित्र
कुठे समर्थ धीरोदात्त । संत सर्व ।।"

पण सामान्य माणुस ज्या विपरित, भयंकर परिस्थितीला तोंड देत जगतो आहे ते पाहता संतवचनांचा आदर्श कालबाह्य ठरल्या सारखे वाटते. या दोन विरूद्ध परिस्थितीत ईश्वर कसा जाणावा, कसा भजावा हा प्रश्न मर्ढेकरांना पडतो. संतकाळापासून ते आतापर्यंत श्रद्धेचे हे अंतर वाढतच गेलेले दिसते. तरी मर्ढेकरांचे सश्रद्ध मन ईश्वरालाच साकडे घालते.

"परि फाटे हे अंतर । आणि जन्मा येई अंबर ।
तोडा नाळ अवडंबर । नारायणा ।।"

सर्व संतश्रेष्ठांमध्ये मर्ढेकरांची नाळ अधिक जुळली आहे ती तुकारामांशी. दोघांची स्वतंत्र प्रज्ञा आणि आत्मोद्धाराबरोबर समाजोद्धाराची कळकळ असणारे चिंतशील मन दोघांनाही लाभले होते. स्वसामर्थ्यांमधे तुकाराम मर्ढेकरांपेक्षा सरस ठरतात, तर स्वसामर्थ्यापेक्षा स्वतःच्या मर्यादाच मर्ढेकरांना अधिक दिसतात. तुकारामांनी परमेश्वराची सगुणभक्ती केली पण मर्ढेकरांच्या मनात परमशक्तीचे अशे विशिष्ट रूप नव्हते, नाव नव्हते, त्यांचा कर्मकांडावर विश्वासही नव्हता. म्हणूनच मर्ढेकरांना माणसाच्या शारीरिक, मानसिक रचनेचे बांधकाम सुंदर वाटते, नश्वरतेचे मखर वाटते, मिथत्वाचे महाद्वार वाटते. तरी या कोरीव हाडांच्या महालात नाशवंत हरीचा लाल ईश्वर कसा ठेवतो असा रोकडा सवाल ते करतात. इथेच मर्ढेकरांची आध्यात्मिक कविता काकणभर तुकारामांच्याही पलीकडे जाताना दिसते. कारण मर्ढेकरांच्या आध्यात्मिक कवितेला भीषण समाजवास्तवाची पार्श्वभूमी लाभली होती. तुकारामांसमोर मानसिकरित्या रंजले–गांजलेले होते. पण मर्ढेकरांसमोर तर मेलेले, प्रेतरूपी जमदग्नी होते. अशा परिस्थितीत ईश्वराचा सकारात्मक विचार मांडणे सोपे नव्हते. म्हणूनच श्रद्धेच्या प्रारंभीच्या वाटचालीत काही कवितांत मर्ढेकर ईश्वराला स्पष्ट सवाल करतात की, तुझ्या शोधार्थ आपल्या जीवाचे मी रान केले, साधुसंतांप्रमाणे मी तपश्चर्या केली नाही म्हणून तर तू ब्रह्मांडात रूसून बसला नाही. आपली ही ताटातूट झाली अन् बुद्धीला ज्ञात–अज्ञाताची काचणी लागली.

मर्ढेकरांचे वैयक्तिक जीवन कायमच वादग्रस्त आणि वादळी ठरले. त्यांच्या मानसिक विचार आंदोलनांची गती इतकी जास्त होती की त्यांचे प्रतिबिंब वारंवार त्यांच्या काव्यात पडते. त्यांची आध्यात्मिक कविताही याला अपवाद ठरली नाही. त्यामुळे ईश्वराचा शोध घेताना सुद्धा त्यांच्या आध्यात्मिक कवितांमधून एकाचवेळी इतके पैलू निर्माण झालेले आहेत की त्याचा सूक्ष्मपणे अभ्यास करायला गेलो तर त्यात विविध टप्प्यांबरोबर विविध अर्थच्छटाही उलगडायला लागतात, आणि मगच शेवटी त्यांच्या आध्यात्मिक कवितांचा विस्तारीत पट दृष्टीसमोर येतो.

ईश्वराचा शोध घेताना सर्वप्रथम मर्ढेकरांच्या मनाला काचणी लागली ती जड–चैतन्याच्या संघर्षाची या संघर्षामुळे मर्ढेकरांच्या मनात एक दुभंगलेपण आलेले दिसते. हा झगडा लौकिक–अलौकिक, आत्मिक, शारीरिक असा आहे, म्हणून ते म्हणतात,

"शिवलिंग माझे लिंग । हेच अशांतीचे बिंग,
ज्यांच्या झुंजे संज्ञारिंग । व्यापिले गा ।। "

एकाचे स्वरूप ज्ञानमय तर दुसऱ्याचे शरीरमय. या दोघांच्या झटापटीत माझी मात्र लुंग्यासुंग्या फकीरासारखी अवस्था होते, असे मर्ढेकर म्हणतात. या द्वद्वांत मर्ढेकरांचा मूळ प्रश्न हाच आहे की ज्ञान आणि वासना यांच्यात विरोध का? वासनेतून ज्ञान झाले व ब्रह्मज्ञानातही वासना अंतर्भूत राहिली तर हे प्रश्न संपणार नाहीत का? पण ही खेच मर्त्यांश–अमर्त्यांशापर्यंत, अनादी, अनंत काळापर्यंत चालते हेच सत्य. पण हे सत्यच ईश्वराच्या कृपामयेबद्दल शंका निर्माण करणारे ठरते, कारण तिथे द्वद्वं तिथे शंका. संदेह येणारच. इथे मर्ढेकरांचे मन प्रत्यक्ष ईश्वरालाच प्रश्न विचारते की जे अज्ञानात जन्मले आणि अज्ञानात मेले त्यांच्याबाबतीतही तू निष्ठुर कसा झालास? मुळात सामान्य माणसाची संज्ञाच दरडीसारखी जड, तरी या रखरखीत देहापलीकडे जाऊ म्हटले तर अहंतेचा पहाड मधे येतो. मर्ढेकरांच्या मनातील द्वंद्व इतके निकराचे होते की देवाला आपलीच पिले खाणाऱ्या शहामृगाची उपमा त्यांनी दिली आणि असाच खितपत पडलो तर मनुष्य खऱ्या अर्थाने जो उद्देश घेऊन जन्माला आला ते घेणे कधी वसूल होईल?

ईश्वरावर अवकृपेचे आरोप करून मर्ढेकरांचे समाधान झाले नाही. त्यांची तर्कबुद्धी वारंवार त्यांना ईश्वराचा अधिक खोलवर जाऊन शोध घेण्यास बजावत होती. ईश्वराचा अधिक सूक्ष्मपणे शोध घ्यायचा म्हणजे तत्त्वज्ञानाकडे वळावे लागते. पण मर्ढेकरांचे तत्त्वज्ञानच मुळात वेगळे, आधी उल्लेख केल्याप्रमाणे त्यांचा टाळ, स्फटिकांची माळ, मृदंग, मनन, पूजन या कर्मकांडावर विश्वास नव्हताच. उलट पुरातन, पारंपरिक तत्त्वज्ञानाबद्दल ते उपरोधिकपणे म्हणतात,

"सांगू कोणा तत्त्वज्ञान । पान – पान जाळी झाले,
गेल्या वर्षीच पोथीत । किडे व्याले ।।"

सनातन विचारांना बुद्धीने नकार दिला तरी विश्वरचनेचे रहस्य मात्र कायम राहते. विश्वरहस्याचे तत्त्वज्ञान काय आहे, विश्व, विश्वनियंता, पृथ्वी, मानव ह्यांच्यातील परस्परसंबंधाबाबत सतत चाललेल्या चिंतनाबरोबरच त्यांच्याशी असणाऱ्या आपल्या नात्याचा, आपल्या स्वतंत्र आणि परतंत्र अस्तित्वाचा कसोशीने शोध घेण्याचा प्रयत्न मर्ढेकर सातत्याने घेतात. अर्थातच हा शोध केवळ विज्ञानप्रभावी अवलंबून राहत नाही. ईश्वरलीला, ब्रह्मांड, पृथ्वी, जड मानव ईश्वराला समजण्यास थिटी पडणारी बुद्धी आणि पुन्हा ईश्वराचा पृथ्वीवरचा अवतार या सर्वांचा चक्राप्रमाणे विचार करताना मर्ढेकर म्हणतात,

"फिरता पिसाट पिसाट । अंतरिक्षी या अफाट
ग्रहमालेचे चऱ्हाट । सूर्यफेकी ।।
अवकाशी पडे पीळ । गाठीगाठीत घननीळ,
जमती आसावरी रीळ । जडत्वाचे ।।

उकलाया सूत्रबद्ध गाठी । आमुच्या बुद्धीसी वेठी
कासया धरिलेस जगजेठी । सर्वसाक्षी ।।
जरी आत्मविश्वास आम्हा । आणि सत्याचाही पान्हा ।
तरी ढोरांचाच कान्हा । शेवटी तू !।।"

मर्ढेकर आंधळेपणाने ईश्वराचा स्वीकार करीत नाही उलट ईश्वराला समजून घेण्यासाठी बुद्धीचा कस लागतो याची त्यांना जाणीव आहे. अखिल ब्रह्मांडाच्या अनंततेचे आणि ईश्वरी रूपाचे गूढ उलगडण्याला मानवाची प्रज्ञा अपुरीच पडते. म्हणून मर्ढेकरांसारख्या कवीला प्रश्न पडतात, कधी जन्मली पृथ्वी? निळ्या वायुच्या सलग लगडी कधी जमल्या? आणि त्यातील जडतेला संवेदनेचे पोत कधी प्राप्त झाले?

विश्वरहस्याच्या सूत्रबद्ध गाठी उकलण्याचा प्रयत्न केल्यानंतर समाजातील सुख–दुःखाच्या गाठी उकलण्याचाही प्रयत्न मर्ढेकर करतात. तो करीत असताना प्रारंभी समाजवादाला त्यांनी कौल लावलेला दिसून येतो. पण तो त्यांचे समाधान करू शकताना दिसत नाही. विज्ञानवादाचे कुंपण तर स्मशानात असल्याचे त्यांनी स्पष्टपणे आधीच जाहीर केले. मग त्यांच्यासमोर उरला एकच मार्ग तो म्हणजे ईश्वरवादाचा, ईश्वरशरणतेचा. मर्ढेकरांची ही भूमिका भिन्न आहे ती एवढ्याच करिता की इतर लोक संघर्ष न करता परंपरेला अनुसरून ईश्वरशरण होतात तर मर्ढेकर ईश्वराचे अस्तित्व आणि त्याची विश्वकरूणा बुद्धीच्या कसोटीवर जोखूनच ईश्वरशरण होतात. त्यांच्या कवितांमधून वारंवार ईश्वरदर्शनाची ओढ प्रकट झाली आहे. मर्ढेकरांच्या या ईश्वरभेटीच्या ओढीमधे पारंपरिक पद्धतीने संतसदृश भक्तीमयतेचे स्वप्नरंजन नाही, उलट त्यातही

त्यांची सजगता दिसते. ईश्वर भेटीला आलाच आणि त्यांनी आलिंगन दिले तर आपल्या ठिसूळ बरगड्या मोडतील, अर्थात लौकिकार्थाने आपले जीवन संपेल अशी भीती व्यक्त करताना ते ईश्वराला म्हणतात,

"येशिल तेव्हा जपून ये तूं,
ठिसूळ माझ्या पहा बरगड्या,
आलिंगन तू देता मनाला
कडुकडुनी, ह्या पिचतिल निधड्या
परंतू टाळू नको यावया
ठिसूळ माझ्या म्हणुनि बरगड्या."

कारण, मृत्यूनंतरचे ईश्वरसानिध्य मर्ढेकरांना अर्थहीन वाटते. आपल्या स्नायूंच्या तारांचा स्वीच ईश्वराच्या हाती असला तरी तेजाचा एकच क्षण अनुभवला तरी स्नायूंचे कण तरारून उठतील असे मर्ढेकरांना वाटते. ईश्वरभेटीची आर्तता मर्ढेकरांच्या मनात इतकी वाढीला लागते की 'वावडी वाह्यात माझी' सारख्या कवितेतून ते व्याकूळतेचा उच्चांक गाठतात. आपली बुद्धीरूपी, मनरूपी पतंगाची दोरी ईश्वराच्या हातात आहे म्हणून ईश्वराला ते विनवतात की,

"वावडी वाह्यात माझी । पोकळीचा पिंजरा ।
सोड दोरी जाऊ दे ह्या कागदाच्या पाखरा ।। "

मर्ढेकरांनी ईश्वरभेटीची अनिवार ओढ 'काही कविता' तील पुष्कळ कवितांमधून व्यक्त केली आहे. पण मर्ढेकरांच्या अपेक्षेची पूर्ती मात्र काही त्यात झालेली दिसत नाही, म्हणून 'काही कविता'च्या शेवटी मर्ढेकरांचा सात्त्विक संताप आपले डोके वर काढतो आणि उद्वेगाने मर्ढेकर म्हणून जातात.

"आलो क्षणिचा विसारा म्हणून;
टेकले पायः
तो तूच हटकलेस 'कोण?' म्हणून
आणि मनातले शिणलेले हेतू
शेण झाले."

'वावडी वाह्यात माझी' आणि 'आलो क्षणिचा विसावा' ह्या दोन्ही कविता सखोलपणे वाचल्यास मर्ढेकरांच्या मनात झपाट्याने येणाऱ्या ईश्वरभेटीच्या विचारांदोलनाची गती लक्षात येईल.

'आणखी काही कविता' मधे मात्र मर्ढेकरांच्या आध्यात्मिकतेला नम्रतेची अशी काही किनार प्राप्त झालेली दिसते की असे वाटते मर्ढेकर जीवाच्या आकांतानी जे काही शोधत होते ते त्यांना आत्ता मिळाले असा विश्वास वाचकाच्या मनात निर्माण होतो. माणुसकीचा वसा घेऊन, श्रद्धेच्या मार्गावरून घडणारी समाजसापेक्षा कृतीशीलता मर्ढेकरांना अपेक्षित आहे. ईश्वरकृपेनेच आत्मोद्धार आणि समाजोद्धार होतो यावर मर्ढेकरांचा पूर्ण विश्वास असल्यामुळे ते ईश्वराला म्हणतात,

"भरून येईल हृदय जेधवा
शरीर पिछुनी निघेल घाम;,

अन् शब्दांच्या तोंडांमध्ये
बसेल तूझा गच्च लगाम;

काळ्यावरती जरा पांढरे
ह्या पाप्याच्या हातुन व्हावे
फक्त तेधवा: आणि एरव्ही
हेच पांढऱ्यावरती काळे!"

'भंगु दे काठिन्य माझे' ही कविता तर मर्ढेकरांचे आधुनिक पसायदानच आहे. ईश्वरभेटीसाठी आत्म्याचे शुद्धीकरण आवश्यक असते. ज्याला आपण प्युरीफिकेशन ऑफ सोल म्हणतो. त्याचेच दान मर्ढेकर या कवितेतून मागतात.

"भंगु दे काठिन्य माझे
आम्ल जाऊ दे मनीचे;
येउ दे वाणीत माझ्या
सूर तुझ्या आवडीचे."

या कवितेतून मर्ढेकरांच्या काव्यदृष्टीतील ईश्वरसापेक्षता, श्रद्धेचे स्वरूप, नम्रता, ईश्वराची कृपामयता व पर्यायाने जीवनदृष्टी स्पष्ट होते. कारण खरी श्रद्धा तीच असते जिला महाद्वाराच्या पायरीशीही तडा जात नाही असे जरी असले तरी मर्ढेकरांचे वास्तवाशी इमान राखणारे मन स्वतःच्या अपूर्णावस्थेची जाणीव वारंवार प्रगट करताना दिसते, 'ठायी ठायी रूप तुझे' आणि 'तुझ्यासाठी देवा काय म्या झुरावे' अशा कवितांमधून स्वतःच्या थिटेपणाची जाणीव वारंवार व्यक्त झाली आहे. संत–महंतासारखी मोक्षप्राप्ती मुक्ती आपल्याला मिळणार नाही हे मर्ढेकरांना माहीत होते. किंबहुना त्यांना तशी मुक्ती अपेक्षितही नव्हती. उलट ईशकृपेचे नख गळ्याला लागल्यानंतरच सामर्थ्याचा स्वर निर्माण होतो हा त्यांचा विश्वास होता. 'ह्या गंगेमधि गगन वितळले' सारख्या साक्षात्कारसदृश अनुभवाच्या कवितेतूनही त्यांनी व्यक्तिमत्त्वाच्या उदात्तीकरणालाच महत्त्व दिले, तो प्रत्यक्ष साक्षात्कार नसून आभास जरी असला. तरी चैतन्यमयी आहे. दिव्यत्वाची आणि उभ्या जगावर ईश्वराच्या मायेची आडवी कमान चढल्याची प्रचीती देणारा आहे. प्रत्यक्ष दर्शन हा उद्देशच नसल्यामुळे मर्ढेकर शेवटच्या कडव्यात स्पष्टपणे म्हणू शकतात,

"ह्या गंगेमधि गगन वितळले
शुभाशुभाचा फिटे किनारा;
असशिल जेथे तिथे रहा तू
हा इथला मज पुरे फवारा!

मानवी उन्नयनाचे एकमात्र केंद्र म्हणून मर्ढेकर ईश्वरासमोर नतमस्तक झाले. मर्ढेकरांनी आंधळेपणानी ही शरणागतता पत्करली नाही. मुळात ईश्वरप्राप्ती हवी असेल तर माणूसपणाच्या अहंकाराचा त्याग करावा लागतो. मर्ढेकरांची ही शरणागती साधी सरळ नव्हती तर मुठीत नाक धरून, ईश्वराचा शोध घेत, ईश्वराच्या डोळ्यांशी स्वतःचे डोळे पोळत, समोरासमोर सामना केला व नंतरच ते शरण आले म्हणूनच ते परखडपणे म्हणू शकले,

"हासडल्या तुनज शिव्या तरिहि
तुझ्याच आलो पायी लोळत
मुठीत धरूनी नाक, लाविले,
तव डोळ्यांशी डोळे पोळत."

मर्ढेकरांची आध्यात्मिक कविता पृथगात्म, आत्मनिष्ठ, भावनेशी प्रामाणिक आहे. बालपणापासून व्यक्तींवर पारंपरिक संस्कारांचा, तत्त्वज्ञानाचा इतका दाब असतो की मोठेपणी या सर्व गोष्टींचे कळते भान आल्यावर साक्षात्काराचा भास सहज होऊ शकतो. वास्तवानुभूतीची आणि भासानुभूतीची गल्लत सहज होऊ शकते. पण मर्ढेकर ह्याला अपवाद ठरले. माणसाची आध्यात्मिक जाणीव ही ईश्वराचे सरळ–सरळ अस्तित्व मान्य करून पूजा, अर्चा, कर्मकांड यातच अडकलेली असते. कारण त्याच्यावर संस्कारही तसेच झालेले असतात. मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे, सश्रद्ध मन आहे म्हणून ईश्वरही आहे असे सरळ–सरळ त्याच्या श्रद्धेचे समीकरण असते. कदाचित या लौकिक जीवनातले लौकिक उपभोग अधिक चांगल्या पद्धतीने मिळावे हीच भावना त्यामागे जास्त असते. जीवनाची मुख्य अनुभूती ईश्वर होत नाही त्यामुळे ईश्वराच्या कृपामयतेचा, सत्यासत्यतेचा संघर्षशील असा शोध सामान्य माणसाची प्रज्ञा घेऊ शकत नाही. इथेच मर्ढेकरांची आध्यात्मिक जाणीव स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण करणारी ठरते. इतर कवींसाठी तो आध्यात्मिक विचार असेल, पण मर्ढेकरांची आध्यात्मिक जाणीव हा त्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न बनला होता. ईश्वराचा शोध हा त्यांच्याकरता निकराचा आध्यात्मिक संघर्ष बनला होता.

एकच कवी आपल्या आध्यात्मिक कवितेतून ईश्वराच्या विविध छटा, त्याचे अस्तित्व, जीवनात असणारे महत्त्व हे वेगवेगळ्या पद्धतीने मांडतो, त्या कवीच्या श्रद्धेचे, आध्यात्मिक जाणिवेचे स्वरूप किती व्यापक आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे हे आपल्याला कळते. मर्ढेकरांच्या कवितेतील भक्तिभावनेचे स्वरूप समकालीन किंवा पूर्वकालीन भक्तिकाव्यासारखे नाही. ईश्वराशी असणारे त्यांचे नाते हे संपूर्णपणे वेगळे आहे. त्यात ईश्वरभक्त असा संबंध असला तरी पारंपरिक प्रतीकातून येणारा सख्यभावाचा, रतिभावाचा, मातृभावाचा किंवा सेवकभावाचा लडिवाळपणा, आत्यंतिक विनम्रता किंवा सलगी नाही. त्यामुळेच त्यांची आध्यात्मिक कविता पूर्वसूरीच्या आध्यात्मिक कवितेचा कुठेही प्रतिध्वनी वाटत नाही. सांकेतिक नात्यांपेक्षा स्वतःचे काही वेगळेच नाते मर्ढेकर प्रस्थापित करतात. जे या आधीच्या सर्व नात्यांना छेद देणारे ठरले. मर्ढेकरांची आध्यात्मिक कविता अशा अपूर्व आणि पृथगात्म भावसंवेदना आणि जीवनजाणिवा यामुळे मराठी काव्यात अपूर्व ठरली. तिने आध्यात्मिक कवितेचा एक श्रेष्ठ मानदंड निर्माण केला यात शंकाच नाही.

## संदर्भ :

1) द. भि. कुलकर्णी, 'दोन परंपरा', नागपूर 1993

2) मर्ढेकरांच्या कविता, मौज प्रकाशन गृह, मुंबई, 1959

3) स. त्र्यं.कुल्ली, 'मर्ढेकरांचे नवे अध्यात्म', तरूण भारत, नागपूर, मार्च, 1990

4) अक्षयकुमार काळे, 'मर्ढेकरांची कविता: आकलन, आस्वाद आणि चिकित्सा', विजय प्रकाशन, नागपूर, 2006

5) अर्वाचीन मराठी काव्यमीमांसा – संपादीत, पद्मगंधा प्रकाशन, पुणे,2014